**INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES**
**© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.MH-659/13(N)**
**www.vmsindia.org**

# संगीत व क्रीडा

**साधना शिलेदार**

सहयोगी प्राध्यापक,संगीत विभाग
वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था ,नागपूर

**सारांश :** कला वा क्रीडा या दोन्हीत मला विलक्षण साम्य जाणवते.जीवनात संपन्नता मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत .त्यापैकी कला व क्रीडा हे दोन मार्ग मला अत्यंत महत्त्वाचे वाटतात."हेल्थ इज वेल्थ' अशी निरोगी जीवनाचे वर्णन करणारी एक म्हण आहे आणि 'साहित्य संगीत कला विहिणाम साक्षात पशू' असे एक सुभाषित आहे. या दोन्हीतून दर्जेदार जीवनाचे मर्म सांगितले आहे. कला व क्रीडा मनुष्याला त्याने कसे जगावे याचे मार्गदर्शन करतात व आपल्या सान्निध्यातअसलेल्या व्यक्तीला अखंड अविरत अवर्णनीय आनंद देतात.खेळण्यामुळे किंवा कलेमुळे मिळणारी उर्जा,त्यातून होणारा भावनांचा निचरा व त्यातून सयमित होणारी आक्रमकता देखील खूप महत्त्वाची असते. मानसशास्त्राच्या परीघातले हे प्रश्न जीवनात कला वा क्रीडा यांचे महत्त्व अधोरेखित करतात. कला अथवा क्रीडा क्षेत्रात काम करीत असताना शारिरिक. मानसिक,बौद्धिक श्रम होऊनही उत्साहजाणवत असतो ,निर्मितीचे समाधान असते व एक सकारात्मक उर्जा जाणवते. निर्मितीपूर्व, निर्मिती दरम्यान व निर्मितीनंतरची मनोवस्था दोन्ही क्षेत्रात सारखी असते.संगीतातला कलाकार आणि खेळाडू आपल्या सर्व संगतकारांसमवेत जे आडवे उभे बंध विणतो त्यातून वीण गुंफली जाते.संगीत आणि खेळ या दोन्ही क्षेत्रातल्या साम्यस्थळांवर प्रस्तुत निबंधातून प्रकाश टाकलेला आहे.

**प्रस्तावना :**

माणूस किती जगला यापेक्षा तो कसा जगला याचे मोल अधिक असते. एखाद्याच्या जीवनाला समृद्ध,निरोगी,उमदे ,सार्थक,अशी कितितरी विशेषणे लावली जातात. ही सम्पन्नता मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत .त्या पैकी कला व क्रीडा हे दोन मार्ग मला अत्यंत महत्त्वाचे वाटतात. 'हेल्थ इज वेल्थ' अशी निरोगी जीवनाचे वर्णन करणारी एक म्हण आहे आणि 'साहित्य संगीत कला विहिणाम साक्षात पशू' असे एक सुभाषित आहे.या दोन्हीतून दर्जेदार जीवनाचे मर्म नेमकेपणाने सांगितले आहे.कला वा क्रीडा या दोन्हीत मला विलक्षण साम्य जाणवते. अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या प्राथमिक जीवनावश्यक गरजा आहेत. मात्र कला व क्रीडा मनुष्याला त्याने समृद्धपणे कसे जगावे याचे मार्गदर्शन करतात . आपल्या सान्निध्यातअसलेल्या व्यक्तीला अखंड अविरत अवर्णनीय आनंद देतात.कलाकार वा ख़ेळाडू यांच्यात जीवनाबद्दल एक प्रकारची धुंदी वा उत्सुकता आढळते .आपल्या कार्याप्रति समर्पण, त्यासाठी केली जाणारी पूर्वतयारी , मेहनत, त्याच्या मांडणीबद्दलचे विचार त्यांच्या मनात कधी जाणतेपणी तर कधी अजाणता रेंगाळत असतात.ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे .त्यांचा मैदानात किंवा मंचावर असतानाचा आनंद अवर्णनीय असतो.इतरांपेक्षा वेगळे असण्याचा,इतरांच्या आकर्षणाचा केंद्रबिन्दू असण्याचा अनामिक आनंद त्याला लाभत असतो म्हणूनच कला व क्रीडा क्षेत्रात काम करीत असताना शारिरिक, मानसिक,बौद्धिक श्रम होत असूनही खेळाडू वा कलाकार याच्यात उत्साह असतो , निर्मितीचे समाधान असते व एक सकारात्मक उर्जा जाणवते. निर्मितीपूर्व, निर्मिती दरम्यान व निर्मितीनंतरची त्याची मनोवस्था दोन्ही क्षेत्रात सारखी असते.

कलांचे अनेक प्रकार आहेत. ललित कला व उपयोजित कला असे एक वर्गीकरण आहे. ललित कलांच्या श्रेष्ठतेचे निकष त्या कलेतच सामावलेले असतात तर उपयोजित कलांच्या श्रेष्ठतेसाठी तिची उपयोगिता महत्त्वाची असते. संगीत ही एक ललित कला आहे. म्हणूनच संगीताने काय मिळते, त्याचा काय उपयोग आहे असे प्रश्न निरर्थक ठरतात. वरपांगी त्याचे उत्तर 'काहीच नाही' असे दिसत असले तरी ते खरे तर 'खूप काही' असे असते. "दिवसभर नुसता खेळत बसतोस अभ्यास करत नाहीस" असे म्हणून प्रत्येक लहान मुलाला त्याच्या घरातले मोठे लोक रागावतात. परंतू खेळण्यामुळे किंवा कलेमुळे मिळणारी उर्जा,त्यातून होणारा भावनांचा निचरा व त्यातून होणारे आक्रमकतेचे संयमन देखील खूप महत्त्वाचे असते. भावनांना वाट न मिळल्यामुळे त्याचे शरीरावर परिणाम होणे अथवा शारिरिक उर्जेला वाट न मिळाल्यामुळे त्याचे मनावर परिणाम होणे हे मानसशास्त्राच्या परीघातले प्रश्न जीवनातले कला वा क्रीडा यांचे महत्त्व अधोरेखित करतात.

संगीत ही एक सादरीकरणाची कला (पर्फोर्फिंग आर्ट) आहे. मंचावर बसून पुढ्यात बसलेल्या श्रोत्यांच्या साक्षीने तो कला निर्मितीकरतो . कथा ,कादम्बरी, कविता अशा साहित्यक्षेत्रात किंवा चित्रकला या क्षेत्रात कलाकृतीची निर्मिती पूर्ण झाली की तिचा आस्वाद घेतला जातो तर संगीताच्या मैफिलीत निर्मिती वा आस्वाद एकाचवेळी घडत जातो. यामुळे मैफिलीला जिवंतपणा लाभत असला तरी मैफिलीतला प्रत्येक क्षण अनिश्चित असतो. तेथे काय घडेल याची खात्री देता येत नाही. संगीत कलेचे आणि ख़ेळांचे या बाबतीतले साम्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. खेळांचे सामने बघायला जाणारा प्रेक्षक खेळबरोबरच या अनिश्चिततेचाही आस्वाद घेत असतो.प्रत्येक फटक्यात,प्रत्येक पॉइटला , प्रत्येक गोलच्या दरम्यान जाणवणारी अनिश्चितता व उत्सुकता प्रेक्षकाला खिळवून ठेवते.अकल्पित,अनाकलनीय,अशा अनेक गोष्टी मैदानात सतत घडत असतात.संगीत नुसते ऐकल्याने अथवा खेळ नुसता बघितल्यानेदेखील हा आनंद मिळतो मैदानातला जोश जणू त्याच्या तन-मनात प्रतिबिंबित होत असतो .परंतु प्रत्यक्ष कलानिर्मितीचा किंवा खेळण्याचा आनंद यापेक्षा कितीतरी जास्त आणि वेगळ्या प्रकारचा असतो. भरपूर धावून ,जोरकस फटकेबाजी करून ,नजाकतीने प्लेसिंग करून खेळत असताना सर्वांगातून घामाच्या धारा वाहवल्या असल्यामुळे , दिवसभराचा ताजेपणा मिळतो. समोरच्या ख़ेळाडूवर पूर्ण लक्ष केंद्रित करून त्याची प्रत्येक हालचाल टिपून गाफील क्षणी त्याला कोंडीत पकडण्याचे कौशल्य मिळवता मिळवता एकाग्रताही लाभते . स्वरसंगतींचे विभ्रम आणि तालाच्या मात्रांचे हिशोब अंगवळणी पडून काळाचा अंदाज साधू लागतो .खेळांच्या सामन्याप्रमाणेच प्रत्येक मैफिलीचा नूर अथवा रंग वेगवेगळा असतो. मंचावर बसलेला कलाकार आणि मैदानात उतरलेला खेळाडू यांचे आस्वादकांसमोर कौशल्य प्रगट होते तेंव्हा या अर्थाने मला या दोन्ही सादरीकरणाच्या कला वाटतात. मैदानात खेळाडू असतो,त्याच्याच गटातले त्याचे साथीदार असतात.नेट्च्या पलीकडचे विरुद्ध गटातले खेळाडू खेळासाठी प्रतिस्पर्धी असले तरी सादरीकरणाच्या संदर्भात ते ही संगतकारच ठरतात. म्हणूनच एखाद्या विशिष्ट गोलंदाजाला लगावलेल्या षटकाराचा आनंद इतर कोणाच्याही बॉलवर मारलेल्या षटकाराने येत नाही.संगीतातला कलाकार आणि खेळाडू आपल्या सर्व संगतकारांसमवेत जे आडवे उभे बंध विणतो त्यातून वीण गुंफली जाते. 'खिलाडू वृत्ती' असे याचे वर्णन केले जाते.कलेतून व्यक्ती स्वत:ला अभिव्यक्त करते .कलाकार स्वत:चे विचार,स्वत:च्या भावना,स्वत:च्या कल्पना आपल्या कलेतून मांडतो.या अभिव्यक्तीसाठी तो प्रयत्न करीत असतो.कला वा क्रीडा यामुळे संवेदनशीलता वाढते. एकाग्रता,जिद्द, सहनशीलता यासाठी निश्चितपणे कला वा खेळ या क्षेत्रांचा फायदा होतो.बुध्यांक वा भावनांक (आय.क़्यु वा ई.क्यु ) ह्यासाठी देखील ही क्षेत्रे उपयुक्त आहेत.

या दोन्ही क्षेत्रात समानार्थी शब्दा आहेत .क्रीडा क्षेत्रातला 'मेहनत' हा शब्द संगीत क्षेत्रातल्या 'रियाज़' या शब्दाला समांतर आहे.'वर्कआउट' हे ताना किंवा बंदिश घोटण्यासारखे असते.'वार्मिंग अप' हे कंठ साधनेसारखे असते. रोज यंत्रिकपणे कराव्या लागणाऱ्या कृती या दोन्ही क्षेत्रात आहेत. सरावात खंड पडला की परिणाम जाणवेल अशा धोकादायक जागा दोन्हीकडे आहेत. म्हणूनच 'प्रॅक्टिस' किंवा 'साधना' हा या दोन्ही क्षेत्रातला परवलीचा शब्द आहे ख़ेळ सुरू करण्याआधी नेट मधे केला जाणारा सराव आणि मैफिल सुरू करण्याआधी ग्रीनरूममधे केला जाणारा सराव यातही विलक्षण साम्य आहे. या सरावाच्या वेळी खेळाडू वा कलाकार या दोघांच्याही मनात असणारा प्रचंड आत्मविश्वास व त्याचबरोबर 'नीट होईल ना' या भावनेतून येणारी हुरहूर व बैचेनी कायम असते. कितीही मोठा कलाकार असला तरी मैफिल हमखास रंगेलच अशी खात्री जशी देतायेत नाही तशीच कितीही मोठा खेळाडू असला तरी पहिल्याच बॉलला शून्यावर बाद होण्याची शक्यता कधीच नजरेआड करता येत नाही.

हा प्रचंड आत्मविश्वास,ही अनामिक हुरहूर,ही वेढून टाकणारी धुंदी कला वा क्रीडा या दोन्ही क्षेत्रात मला जाणवते. आपणा सर्वानादेखील ती अनुभवायला मिळो ही शुभेछा .

*****